# ॥ श्री ज्ञानदेव हरिपाठ ॥

## श्री संत ज्ञानेश्वर महाराज कृत हरिपाठाचे अभंग

॥ श्री गणेशाय नमः॥

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी ।
कर कटेवरी ठेवून या ॥१॥
तुळशी हार गळा कासे पितांबर ।
आवडे निरंतर हेचि ध्यान ॥२॥
मकर कुंडले तळपती श्रवणी ।
कंठी कौस्तुभमणी विराजीत ॥३॥
तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख ।
पाहीन श्रीमुख आवडीने ॥४॥

**~ १ ~**

देवाचिये द्वारीं उभा क्षणभरी ।
तेणें मुक्ति चारी साधियेल्या ॥१॥
हरि मुखें म्हणा हरि मुखें म्हणा ।
पुंण्याची गणना कोण् करी ॥२॥
असोनि संसारीं जिव्हे वेगु करी ।
वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ॥३॥
ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा ।
द्वारकेचा राणा पांडवां घरीं ॥४॥

**~ २ ~**

चहूं वेदीं जाण साही शास्त्रीं कारण ।
अठराही पुराणें हरिसी गाती ॥१॥
मंथुनी नवनीता तैसें घे अनंता ।
वायां व्यर्थ कथा सांडी मार्गु ॥२॥
एक हरि आत्मा जीवशिवसमा ।
वायां तू दुर्गमा न घाली मन ॥३॥
ज्ञानदेवा पाठ हरि हा वैकुंठ ।
भरला घनदाट हरि दिसे ॥४॥

**~ ३ ~**

त्रिगुण असार निर्गुण हें सार ।
सारासार विचार हरिपाठ ॥१॥
सगुण निर्गुण गुणाचें अगुण ।
हरिवीणें मन व्यर्थ जाय ॥२॥
अव्यक्त निराकार नाहीं ज्या आकार ।
जेथुनि चराचर त्यासी भजें ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ।
अनंत जन्मांनी पुण्य होय ॥४॥

**~ ४ ~**

भावेंवीण भक्ति भक्तिविण मुक्ति ।
बळेंवीण् शक्ति बोलु नये ॥१॥
कैसेनि दैवत प्रसन्न त्वरित ।
उगा राहें निवांत शिणसी वायां ॥२॥
सायासें करिसी प्रपंच दिननिशीं ।
हरिसी न भजसी कवण्या गुणें ॥३॥
ज्ञानदेव म्हणें हरिजप करणें ।

तुटेल धरणें प्रपंचाचें ॥४॥

~ ५ ~

योग याग विधि येणें नोहे सिद्धी ।
वायांचि उपाधि दंभ धर्म ॥१॥
भावेंविण देव न कळे नि:संदेह ।
गुरुविण अनुभव कैसा कळे ॥२॥
तपेंवीण दैवत दिधल्याविण प्राप्त ।
गुजेंविण हित कोण सांगे ॥३॥
ज्ञानदेव सांगे दृष्टांताची मात ।
साधूचे संगती तरुणोपाय ॥४॥

~ ६ ~

साधु बोध झाला तो नुरोनियां ठेला ।
ठायींच मुराला अनुभवें ॥१॥
कापुराची वाती उजळली ज्योति ।
ठायींच समाप्ति झाली जैसी ॥२॥
मोक्ष रेखे आला भाग्यें विनटला ।
साधूंचा अंकिला हरिभक्त ॥३॥
ज्ञानदेवा गोडी संगति सज्जनीं ।
हरि दिसे जनीं वनी आत्मतत्वीं ॥४॥

~ ७ ~

पर्वताप्रमाणे पातक करणें ।
वज्रलेप होणें अभक्तासी ॥१॥
नाहीं ज्यांसी भक्ति ते पतित अभक्त ।
हरिसी न भजत दैव हत ॥२॥
अनंत वाचाळ बरळती बरळ ।

त्यां कैंचा गोपाळ पावे हरि ॥३॥
ज्ञानदेवा प्रमाण आत्मा हा निधान ।
सर्वांघटीं पूर्ण एक नांदे ॥४॥

~ ८ ~

संतांचे संगतीं मनोमार्ग गति ।
आकळावा श्रीपति येणें पंथें ॥१॥
रामकृष्ण वाचा भाव हा जीवाचा ।
आत्मा जो शिवाचा रामजप ॥२॥
एकतत्वनाम साधिती साधन ।
द्वैताचें बंधन न बाधिजे ॥३॥
नामामृत गोडी वैष्णवां लाधली ।
योगियां साधली जीवनकळा ॥४॥
सत्वर उच्चार प्रल्हादीं बिंबला ।
उद्धवा लाधला कृष्णदाता ॥५॥
ज्ञानदेव म्हणे नाम हें सुलभ ।
सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे ॥६॥

~ ९ ~

विष्णुविण जप व्यर्थ त्याचें ज्ञान ।
रामकृष्णीं मन नाहीं ज्याचें ॥१॥
उपजोनी करंटा नेणें अद्वैत वाटा ।
रामकृष्णीं पैठा कैसेनी होय ॥२॥
द्वैताची झाडणी गुरुविण ज्ञान ।
तया कैचें कीर्तन घडे नामीं ॥३॥
ज्ञानदेव म्हणे सगुण हें ध्यान ।
नामपाठ मौन प्रपंचाचे ॥४॥

**भजन**

**रामकृष्णाहरी । जय जय रामकृष्णाहरी ।।**

**रामकृष्णाहरी । जय जय रामकृष्णाहरी ।।**

**~ १० ~**

त्रिवेणीसंगमीं नाना तीर्थे भ्रमी ।
चित्त नाहीं नामीं तरी तें व्यर्थ ॥१॥
नामासी विन्मुख तो नर पापिया ।
हरिवीण धांवया न पावे कोणी ॥२॥
पुराणप्रसिद्ध बोलिले वाल्मीक ।
नामें तीन्ही लोक उद्धरती ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नाम जपा हरीचें ।
परंपरा त्याचें कुळ शुद्ध ॥४॥

**~ ११ ~**

हरि उच्चारणीं अनंत पापराशी ।
जातील लयासी क्षणमात्रे ॥१॥
तृण अग्निमेळें समरस झालें ।
तैसें नामें केलें जपतां हरि ॥२॥
हरि उच्चारण मंत्र हा अगाध ।
पळे भूतबाधा भेणे तेथें ॥३॥
ज्ञानदेव म्हणे हरि माझा समर्थ ।
न करवे अर्थ उपनिषदां ॥४॥

**~ १२ ~**

तीर्थ व्रत नेम भावेंविण सिद्धि ।
वायांचि उपाधि करिसी जनां ॥१॥
भावबळें आकळे येऱ्हवीं नाकळे ।

करतळीं आंवळे तैसा हरि ॥२॥
पारियाचा रवा घेतां भूमिवरी ।
यत्न परोपरी साधन तैसें ॥३॥
ज्ञानदेव म्हणे निवृत्ति निर्गुण ।
दिधलें संपूर्ण माझे हातीं ॥४॥

**~ १३ ~**

समाधि हरिची सम सुखेंवीण ।
न साधेल जाण द्वैतबुद्धि ॥१॥
बुद्धीचें वैभव अन्य नाहीं दुजें ।
एका केशवराजें सकळ सिद्धि ॥२॥
ऋद्धि सिद्धि निधी अवघीच उपाधि ।
जंव त्या परमानंदीं मन नाहीं ॥३॥
ज्ञानदेवी रम्य रमलें समाधान ।
हरिचें चिंतन सर्वकाळ ॥४॥

**~ १४ ~**

नित्य सत्यमित हरिपाठ ज्यासी ।
कळीकाळ त्यासी नातळती ॥१॥
रामकृष्ण उच्चार अनंतराशी तप ।
पापाचे कळप पळती पुढें ॥२॥
हरि हरि हरि मंत्र हा शिवाचा ।
म्हणती जे वाचा तयां मोक्ष ॥३॥
ज्ञानदेवा पाठ नारायण नाम ।
पाविजे उत्तम निजस्थान ॥४॥

**~ १५ ~**

एक नाम हरि द्वैतनाम दुरी ।

अद्वैत कुसरी विरळा जाणें ॥१॥
समबुद्धि घेतां समान श्रीहरि ।
शमदमांवरी हरि झाला ॥२॥
सर्वांघटीं राम देहांदेहीं एक ।
सूर्य प्रकाशक सहस्त्ररश्मी ॥३॥
ज्ञानदेवा चित्तीं हरिपाठ नेमा ।
मागिलिया जन्मा मुक्त झालों ॥४॥

~ १६ ~

हरिनाम जपे तो नर दुर्लभ ।
वाचेसी सुलभ रामकृष्ण ॥१॥
राम कृष्ण नामीं उन्मनी साधली ।
तयासी लाधली सकळ सिद्धी ॥२॥
सिद्धि बुद्धि धर्म हरिपाठीं आले ।
प्रपंची निवाले साधुसंगे ॥३॥
ज्ञानदेवा नाम रामकृष्ण ठसा ।
येणें दशदिशा आत्माराम ॥४॥

~ १७ ~

हरिपाठकीर्ति मुखें जरी गाय ।
पवित्रचि होय देह त्याचा ॥१॥
तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमूप ।
चिरंजीव कल्पकोटि वैकुंठीं नांदे ॥२॥
मातृपितृभ्राता सगोत्र अपार ।
चतुर्भुज नर होऊनि ठेले ॥३॥
ज्ञान गूढ गम्य ज्ञानदेवा लाधलें ।
निवृत्तीनें दिधले माझे हातीं ॥४॥

**~ १८ ~**

हरिवंश पुराण हरिनाम संकीर्तन ।
हरिविण सौजन्य नेणें कांहीं ॥१॥
त्या नरा लाधलें वैकुंठ जोडलें ।
सकळ घडलें तीर्थाटन ॥२॥
मनोमार्गें गेला तो तेथे मुकला ।
हरिपाठीं स्थिरावला तोचि धन्य ॥३॥
ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी ।
रामकृष्णीं आवडी सर्वकाळ ॥४॥

**भजन**

**विठोबा रखुमाई । जय जय विठोबा रखुमाई ।।**
**विठोबा रखुमाई । जय जय विठोबा रखुमाई ।।**

**~ १९ ~**

वेदशास्त्र प्रमाण श्रुतिचे वचन ।
एक नारायण सार जप ॥१॥
जप तप कर्म हरिविण धर्म ।
वाउगाचि श्रम व्यर्थ जाय ॥२॥
हरिपाठीं गेले ते निवांतचि ठेले ।
भ्रमर गुंतले सुमनकळिके ॥३॥
ज्ञानदेवी मंत्र हरिनामाचे शस्त्र ।
यमकुळ गोत्र वर्जियेले ॥४||

**~ २० ~**

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी ।
पापे अनंत कोटी गेली त्यांची ॥१॥
अनंत जन्मांचे तप एक नाम ।

सर्व मार्ग सुगम हरिपाठ ॥२॥
योग याग क्रिया धर्माधर्म माया ।
गेले ते विलया हरिपाठीं ॥३॥
ज्ञानदेवी यज्ञ याग क्रिया धर्म ।
हरिविण नेम नाहीं दुजा ॥४॥

**~ २१ ~**

काळ वेळ नाम उच्चारितां नाही ।
दोन्ही पक्ष पाहीं उद्धरती ॥१॥
रामकृष्ण नाम सर्व दोषां हरण ।
जडजीवां तारण हरि एक ॥२॥
हरिनाम सार जिव्हा या नामाची ।
उपमा त्या देवाची कोण वानी ॥३॥
ज्ञानदेवा सांग झाला हरिपाठ ।
पूर्वजां वैकुंठ-मार्ग सोपा ॥४॥

**~ २२ ~**

नित्यनेम नामीं ते प्राणी दुर्लभ ।
लक्ष्मीवल्लभ तयांजवळी ॥१॥
नारायण हरि नारायण हरि ।
भुक्ति मुक्ति चारी घरीं त्यांच्या ॥२॥
हरिविण जन्म तो नरकचि पैं जाणा ।
यमाचा पाहुणा प्राणि होय ॥३॥
ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड ।
गगनाहुनि वाड नाम आहे ॥४॥

**~ २३ ~**

सात पांच तीन दशकांचा मेळा ।

एक तत्त्वीं कळा दावी हरि ॥१॥
तैसें नव्हे नाम सर्वत्र वरीष्ठ ।
तेथें कांहीं कष्ट न लागती ॥२॥
अजपा जपणें उलट प्राणाचा ।
तेथेंहि मनाचा निर्धार असे ॥३॥
ज्ञानदेवा जिणें नामेंविण व्यर्थ ।
रामकृष्णीं पंथ क्रमियेला ॥४॥

**~ २४ ~**

जप तप कर्म क्रिया नेम धर्म ।
सर्वांघटीं राम भावशुद्ध ॥१॥
न सोडी हा भावो टाकीरे संदेहो ।
रामकृष्ण टाहो नित्य फोडी ॥२॥
जाति वित्त गोत कुळशील मात ।
भजे कां त्वरीत भावयुक्त ॥३॥
ज्ञानदेवा ध्यानीं रामकृष्ण मनीं ।
वैकुंठभुवनी घर केलें ॥४॥

**~ २५ ~**

जाणीव नेणीव भगवंतीं नाहीं ।
हरिउच्चारणीं पाही मोक्ष सदां ॥१॥
नारायण हरि उच्चार नामाचा ।
तेथें कळिकाळाचा रीघ नाहीं ॥२॥
तेथील प्रमाण नेणवें वेदांसी ।
तें जीवजंतूंसी केंवी कळे ॥३॥
ज्ञानदेवा फळ नारायण पाठ ।
सर्वत्र वैकुंठ केलें असे ॥४॥

~ २६ ~

एक तत्व नाम दृढ धरीं मना ।
हरीसी करुणा येईल तुझी ॥१॥
तें नाम सोपेंरे रामकृष्ण गोविंद ।
वाचेसी सद्गद जपा आधीं ॥२॥
नामापरतें तत्त्व नाहीं रे अन्यथा ।
वायां आणिका पंथा जाशील झणीं ॥३॥
ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी ।
धरोनी श्रीहरि जपे सदां ॥४॥

~ २७ ~

सर्व सुख गोडी साही शास्त्रें निवडी ।
रिकामा अर्धघडी राहूं नको ॥१॥
लटिका व्यवहार सर्व हा संसार ।
वायां येरझार हरिवीण ॥२॥
नाम मंत्र जप कोटी जाईल पाप ।
रामकृष्णीं संकल्प धरुनि राहें ॥३॥
निजवृत्ति हे काढी सर्व माया तोडी ।
इंद्रियां सवडी लपू नको ॥४॥
तीर्थी व्रतीं भाव धरी रे करुणा ।
शांति दया पाहुणा हरि करी ॥५॥
ज्ञानदेवा प्रमाण निवृत्तिदेवीं ज्ञान ।
समाधि संजीवन हरिपाठ ॥६॥

~ २८ ~

अभंग हरिपाठ असती अठ्ठावीस ।
रचिले विश्वासें ज्ञानदेवें ॥१॥

नित्य पाठ करी इंद्रायणीतीरीं ।
होय अधिकारी सर्वथा तो ॥२॥
असावें एकाग्रीं स्वस्थ चित्त मनीं ।
उल्हासें करूनी स्मरावा हरी ॥३॥
अंतकाळी तैसा संकटाचे वेळीं ।
हरि त्या सांभाळी अंतर्बाह्य ॥४॥
संतसज्जनांनी घेतली प्रचीति ।
आळसी मंदमति केवीं तरे ॥५॥
श्रीगुरु-निवृत्तिवचन तें प्रेमळ ।
तोषला तात्काळ ज्ञानदेव ॥६॥

**~ २९ ~**

कोणाचे हे घर हा देह कोणाचा ।
आत्माराम त्याचा तोचि जाणे ॥१॥
मी तू हा विचार विवेके शोधावा ।
गोविंदा माधवा याची देही ॥२॥
देही ध्याता ध्यान त्रिकुटी वेगळा ।
सहस्त्र दळी उगवला सुर्य जैसा ॥३॥
ज्ञानदेव म्हणे नायनाची ज्योती ।
या नावेरूपे ती तुम्हीं जाणा ॥४॥

**~ ३० ~**

नामसंकीर्तन साधन पै सोपे ।
जळतील पापे जन्मांतरीची ॥१॥
न लगती सायास जावे वनांतरा ।
सुखे येतो घरा नारायण ॥२॥
ठायीचं बैसोनि करा एकचित्त ।

आवडी अनंत आळवावा ॥३॥
रामकृष्णहरि विठ्ठल केशवा ।
मंत्र हा जपावा सर्वकाळ ॥४॥
याविण आणिक असता साधन ।
वाहतसे आन विठोबाची ॥५॥
तुका म्हणे सोपे आहे सर्वांहूनी ।
शहाणा तो धनी घेतो येथे ॥६॥

**॥ इति श्री ज्ञानदेव महाराज संपूर्ण हरिपाठ समाप्त ॥**